
'युनिक फीचर्स'चं मासिक
वाचा, पहा, ऐका : पहिले मराठी ई-साहित्य संमेलन
www.uniquefeatures.in
जानेवारी २०११
४० रुपये
अनुभव
का नाही?
हा प्रश्न जन्माला घालतो सर्व
इनोव्हेशन्स
डॉ. रघुनाथ माशेलकर
यांच्याशी बातचीत
विकिलीक्स
नव्याने उदयाला आलेल्या मिडियाविषयी
निशिकांत भालेराव
भिंतीपलिकडच्या चीनविषयी
सचिन अधिकारी
आहे रे । नाही रे
वर्गांचे धागे गुंफणाऱ्या 'गूंज'विषयी
नव्या मालिका
निळू दामले
संजय जोशी
आनंद अवधानी

## सहजीवनाचे अंतरंग उलगडणारं आत्मकथन




**ती आणि मी**
**भवरलाल जैन**
**मॅजेस्टिक प्रकाशन**
**किंमत: २०० रुपये**

प्रसिद्ध उद्योजक भवरलाल जैन हे जैन पाइप्सचे निर्माते म्हणून सुप्रसिद्ध आहेत. उद्योजक असूनही लिखाणातही त्यांना चांगली गती आहे. 'ती आणि मी' हे याचं उदाहरण. भवरलाल यांचं हे आत्मकथन आहे. पत्नी कांताबाई यांच्या निधनानंतर त्यांनी हे आत्मकथन लिहायला सुरुवात केली. त्यांच्या लग्नापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंतचा आठवणींचा शब्दपट जैन यांनी इथं साकारला आहे. विवाहानंतर या दांपत्याने एकमेकांच्या साहाय्याने केलेला प्रवास वाचकांच्या अंतर्मनाला साद घालतो. कांताबाई कोण होत्या याचं उत्तर देताना भवरलाल 'जैन उद्योगसमूहा'कडे वाचकांचं लक्ष वेधतात आणि स्वतःची ओळख मात्र कांताबाईचा पती एवढीच देतात. त्यांचं आपल्या पत्नीबद्दलचं प्रेम व आदर यातून होतं व्यक्त करतात. एक अनोखं व प्रांजळ आत्मकथन म्हणून 'ती आणि मी'ची ओळख रुजते ती यामुळेच. ■

## गांधी परिवाराचा वेध

रामदास भटकळ यांनी 'जगदंबा' या नाटकातून महात्मा गांधी यांच्यामागे सावलीसारख्या उभ्या राहणाऱ्या कस्तुरबा गांधी यांच्या भावविश्वाचा तसंच एकूणच गांधी परिवाराचा वेध घेतला आहे. गांधीजींवर आतापर्यंत विपुल लेखन झालेलं आहे. त्यामानाने कस्तुरबा गांधींवर फारसं लेखन झालेलं नाही. ती उणीव या नाटकाच्या निमित्ताने काही प्रमाणात भरून निघते. गांधीजींबरोबरच्या प्रवासात स्वतःची फरफट करून न घेता कस्तुरबांची– एका मध्यमवर्गीय स्त्रीची असामान्यत्वाकडे झालेली वाटचाल या नाटकातून चित्रित झालेली आहे.

रामदास भटकळ यांचं प्रस्तुत नाटकाच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधीचं टिपण व प्रतिमा कुलकर्णी यांचा दिग्दर्शकीय प्रक्रिया उलगडून दाखविणारा लेखही यात समाविष्ट आहे. त्यातून नाटकाची लेखन व सादरीकरणाची प्रक्रिया उलगडते. ■




**जगदंबा, रामदास भटकळ, लोकवाङ्मयगृह प्रकाशन,१०० रुपये**

## सहजीवनाची अनुभवसंपन्न वाटचाल




**सुवर्णकिरणे**
**विजया माधव चितळे**
**साकेत प्रकाशन**
**किंमत: २७५ रुपये**

जलतज्ज्ञ माधवराव चितळे व विजयाताई चितळे यांच्या सहजीवनाची अनुभवसंपन्न वाटचाल 'सुवर्णकिरणे'मधून विजया चितळे यांनी मांडली आहे.

सुसंस्कृत व संपन्न कुटुंबात वाढलेल्या, अष्टपैलू बुद्धिमान विद्यार्थिनी असलेल्या, कला–क्रीडा प्रकारांत प्रावीण्य मिळवलेल्या विजयाताई लग्नानंतर गृहिणीच्या रूपात स्वतःला निष्ठापूर्वक सिद्ध करतात. माधवरावांच्या अर्धांगिनी या नात्याने बांधकाम प्रकल्पांवरचं जोखमीचं आयुष्य त्या समरसून जगतात. माधवरावांच्या कार्यमग्न व धावपळीच्या आयुष्यातही त्या त्यांना खंबीरपणे साथ देतात. माधवरावांच्या पाण्याच्या क्षेत्रात चाललेल्या संशोधनाच्या व नवनव्या उपक्रमांच्या डोळस साक्षीदार बनतात. या साऱ्या प्रवासातले दुर्मिळ क्षण त्यांनी अतिशय साध्या–सोप्या शैलीत वाचकांसमोर मांडले आहेत. त्यांच्या सहजीवनाचा व माधवरावांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख आपल्या डोळ्यांसमोर उभा करणारा बहुरंगी, मनस्वी जीवनप्रवास त्यामुळेच वाचनीय झाला आहे. ■

## स्वागत

**होऊ दे रे आबादाणी**, श्रीराम गोविंद गव्हाणे, बळीवंश प्रकाशन, नांदेड, पृष्ठे: ६४, मूल्य: ६० रुपये

**सारी संभ्रमाची जळमटं**, शरद बापट, अक्षरमानव प्रकाशन, पृष्ठे:१७६, मूल्य: १७० रुपये

**गृह वैद्य**, वैद्य सुयोग दांडेकर, सुकृत प्रकाशन, पृष्ठे: १९६, मूल्य: ३५० रुपये

